महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

रविवार ❖ ०८ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६३ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024



## कार्य कर्तृत्वाची 'शपथ'..!!

❝ माझ्या मुरबाड मतदारसंघातील मायबाप जनतेने सलग पाचव्यांदा माझ्यावर दर्शवलेल्या विश्वासाचा आदर करून आज महाराष्ट्र विधिमंडळाच्या सदस्यत्वाची शपथ ग्रहण केली. मतदारसंघ आणि राज्याच्या प्रगतीसाठी निष्ठापूर्वक कार्य करण्यास कटिबद्ध राहीन

○ आमदार किसन कथोरे



❝ आज माझ्या १४२ कल्याण पूर्व मतदारसंघातील मायबाप जनतेच्या वतीने आमदारपदाची शपथ घेतली. महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री मा. श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात घेतलेली ही शपथ तुमच्या अखंड सेवेसाठी आणि उन्नतीसाठी आहे. माझ्या भावांनो, बहिणींनो, मातांनो: तुमचे कल्याण आणि तुमची समृद्धी यातच माझे सौख्य सामावले आहे.

○ आमदार सुलभा गायकवाड



❝ आज महाराष्ट्र विधानसभेत १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून शपथ घेतली. हा क्षण माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि जबाबदारीचा आहे. ठाणे विधानसभा मतदारसंघाच्या सर्व नागरिकांनी माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, तो माझ्या कामातून सार्थ ठरवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन. ठाणे मतदारसंघाचा विकास, नागरिकांचे हित आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम कटिबद्ध राहीन. आपल्या सर्वांच्या विश्वासावर खरा उतरून, ठाणे आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी कार्यरत राहणार आहे. चला, एकत्र येऊन आपल्या ठाण्याला विकासाचा आदर्श बनवूया आणि महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देऊया!

○ आमदार संजय केळकर

# विधानसभेत नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी

## विरोधकांचा शपथविधीवर बहिष्कार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ प्रतिनिधी

महायुतीचा शपथविधी सोहळा पार पडला. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यातच काल भाजपचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी हंगामी अध्यक्ष म्हणून राजभवनात जाऊन शपथ घेतली. कोळंबकर यांच्या अध्यक्षतेखाली आज विशेष अधिवेशनात आमदारांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली जाणार आहे. ९ डिसेंबरला नव्या विधानसभा अध्यक्षांची निवड होणार असून राज्यपालांच्या दोन्ही सभागृहातील अभिभाषणाने अधिवेशनाची सांगता होणार आहे. याचपार्श्वभूमीवर नवनिर्वाचीत काही आमदारांचा शपथविधी झाला असून दुसरीकडे विरोधक हे ईव्हीएमच्या विरोधात आंदोलन करत आहेत. विरोधी पक्षांचे आमदार विधानभवनातून बाहेर पडले असून विरोधी पक्षातील आमदारांनी सभात्याग केला आणि ईव्हीएमचा निषेध म्हणून आज विरोधक शपथ घेणार नाही आहेत. तर महायुतीकडून आतापर्यंत काही आमदारांनी विधानसभा सदस्यत्त्वाची शपथ घेतली आहे.





दोन दिवसांत नव्या आमदारांचा शपथविधी पार पडल्यानंतर सोमवारी विधानसभेच्या नव्या अध्यक्षांची निवड केली जाईल. विधानसभेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा भाजप नेते राहुल नार्वेकर यांचीच वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे. यंदाच्या विधानसभेत पहिल्यांदाच निवडून आलेल्या पान ४ वर ▶▶

### विधानसभा सदस्यत्त्वाची शपथ घेतलेले नवनिर्वाचीत आमदार

| | | |
|---|---|---|
| देवेंद्र फडणवीस | कुमार आयलानी | भरत गोगावले |
| एकनाथ शिंदे | प्रताप चिखलेकर | मंदा म्हात्रे |
| अजित पवार | दिलीप बोरसे | मनिषा चौधरी |
| दिलीप वळसे पाटील | संजय शिरसाट | सीमा अहिरे |
| राहुल नार्वेकर | हरिश पिंपरे | सुलभा गायकवाड |
| नरहरी झिरवळ | प्रशांत ठाकुर | रंजना जाधव |
| छगन भूजबळ | जयकुमार रावल | स्नेहा दुबे |
| गिरिश महाजन | माणिकराव कोकाडे | सना मलिक |
| हसन मुश्रीफ | आशिष जैस्वाल | दौलत दरोडा |
| गणेश नाईक | चंद्रकांत पाटील | विजय शिवतारे |
| बबनराव लोणीकर | धनंजय मुंडे | दत्तात्रे भरणे |
| दादा भुसे | आदिती तटकरे | राजेंद्र पाटील |
| गुलाबराव पाटील | संजय भनसोडे | देवयानी फरांदे |
| संजय राठोड | प्रकाश सोळंके | मोनिका राजळे |
| उदय सामंत | सरोज अहिरे | श्वेता महाले |
| दिपक केसरकर | मंजुळा गावित | नमिका मुंदडा |
| शंभूराज देसाई | विद्या ठाकुर | मेघना साकोरे बोर्डीकर |
| सुभाष देशमुख | योगेश साबर | अनुराधा चव्हाण |
| संजय केळकर | राणाजगजितसिंह पाटील | श्रीजया चव्हाण |
| मंगेश कुडाळकर | अर्जुन खोतकर | सई डहाके |
| राजेश शिरसागर | अनिल पाटील | किसन कथोरे |
| नरेंद्र भोंडेकर | अतुल सावेयांनी | शिवेंद्रसिंहराजे भोसले |
| भानुदास कर्डीले | रविंद्र चव्हाण | अबू आझमी |
| बाबासाहेब पाटील | धर्मरावबाबा आत्राम | बालाजी किणीकर |
| चंद्रदिप नरके | | जयकुमार गोरे |
| प्रदिप जैस्वाल | | काशिराम पावरा |



## हा निवडून देणाऱ्या मतदार जनतेचा अपमान – प्रवीण दरेकर

विरोधकांनी विधीमंडळ अधिवेशनात उपस्थित राहुनही शपथविधीवर बहिष्कार टाकलेला आहे. या संदर्भात भाजपाचे आमदार प्रवीण दरेकर यांनी महाविकास आघाडी पराभवाने भांबावलेली आहे. पराभव मोठ्या मनाने स्विकारायचा असतो. त्याने खचून न जात नव्या जोमाने काम करायचे असते. आम्हाला देखील लोकसभेत कमी जागा मिळाल्या होत्या. परंतू आम्ही जनतेसाठी कामाला लागलो आणि विजय मिळवून दाखविला आहे. विरोधक रोज नवनव्या सुरात रडत आहेत. त्यांना आत्मपरिक्षण करावे जनतेचे काम करावे असाही सल्ला प्रवीण दरेकर यांनी दिला आहे.विरोधक काही तरी नौटंकी करीत आहेत. त्यांना मतदान करुन निवडून देणाऱ्या जनतेचा ते अपमान करीत आहेत असा आरोप करीत असल्याचे प्रवीण दरेकर यांनी केला आहे. त्यांनी शपथविधीवर बहिष्कार टाकून घटनेचा अपमान केला असल्याचेही प्रवीण दरेकर यांनी म्हटले आहे.

## विधानपरिषद सभागृह नेते पद शिंदे गटाकडे?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला निर्विवाद बहुमत मिळालं असून गुरुवारी (५ डिसेंबर) देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. तर, एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

राज्यात सरकार स्थापन झालं असलं तरी अद्याप मंत्रिमंडळ विस्तार बाकी आहे. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार याकडे अनेकाचं लक्ष लागलं आहे. सध्या सर्व खाती ही एकट्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच आहेत. दुसरीकडे, भाजपा आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेमध्ये गृहमंत्री पदासाठी रस्सीखेच चालू असल्याचं पाहायला मिळत आहे.

दरम्यान, विधान परिषदेचे महायुतीचे सभागृह नेता म्हणून एकनाथ शिंदे होण्याची शक्यता आहे. सध्या देवेंद्र फडणवीस हे विधानपरिषदेचे सभागृह नेता आहेत. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, मुख्यमंत्री हा दोन्ही सभागृहाचा नेता असतो. कामकाजाच्या सोयीसाठी हे पद नियमानुसार मंत्री महोदयाकडे जाऊ शकते. शिंदे हे मंत्री झाल्यावर सभागृहातील त्यांना कामकाजात सहभागी होता येईल. परंतु त्यांना मतदानाचा अधिकार नसेल.

प्रोटोकॉलनुसार महायुती सरकारमध्ये एक नंबरला देवेंद्र फडणवीस आहेत. त्यानंतर दोन नंबरला एकनाथ शिंदे आणि तीन नंबरला अजित पवार आहेत. एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्या क्रमांकावर पान ४ वर ▶▶



## मधुकरराव पिचड अनंतात विलीन
## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

❝ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाहिली श्रद्धांजली. सुसंस्कृत,वंचितांच्या हक्कांसाठी लढणारे व्यक्तिमत्त्व हरपले

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ प्रतिनिधी

माजी आदिवासी विकासमंत्री मधुकरराव पिचड यांच्या पार्थिवावर अकोले तालुक्यात राजूर येथील मधुकरराव पिचड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कै.पिचड यांच्या पार्थिवाचे राजूर येथील निवासस्थानी अंत्यदर्शन घेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी त्यांनी कै.पिचड यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. माजी मंत्री मधुकरराव पिचड यांचे जाणे ही अतिशय दुःखद घटना पान ४ वर ▶▶

# मविआला सुरुंग : महाविकास आघाडीतून एक पक्ष बाहेर पडणार





## उद्धव ठाकरेंच्या भूमिकेवर संशय

### समाजवादीचे आमदार अबु आझमी मविआतून बाहेर पडणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : समाजवादी पक्षाने महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची भूमिका घेतली आहे. उद्धव ठाकरेंच्या भूमिकेवर संशय घेत समाजवादी पक्षाचे आमदार अबु आझमी यांनी मविआतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीला हा मोठा धक्का मानला जात आहे.

शनिवार, ७ डिसेंबर रोजी विधानसभेच्या विशेष अधिवेशनात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी पार पडला. मात्र, विरोधी पक्षांनी ईव्हीएमचा मुद्दा उपस्थित करत या शपथविधीवर बहिष्कार टाकला. परंतू, समाजवादी पक्षाच्या आमदारांनी महाविकास आघाडीची ही भूमिका नाकारत आमदारकीची शपथ घेतली. त्यानंतर अबु आझमींनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचे जाहीर केले. 'निवडणूकीत पराभव झाल्यानंतर शिवसेनेने (उबाठा) पुन्हा एकदा आपली भूमिका बदलली आहे. माझा हिंदूत्वाचा मुद्दा कायम राहील, पान ४ वर ▶▶

# स्थानिक स्वराज्य संस्था व महानगरपालिका निवडणुकांचा मार्ग मोकळा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
□ प्रतिनिधी

निर्देशांमुळे देशभरातील, विशेषतः महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व महानगरपालिकांच्या निवडणुकांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत, जिल्हा परिषद, आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका बराच काळ प्रलंबित होत्या. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या अनेक विकास कामांना गती येण्यास प्रशासनाकडून दिरंगाई होत होती.

विविध कारणांमुळे या निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या, पण आता या प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे. ज्या कारणांमुळे निवडणुका रखडल्या आहेत, त्या कारणांचे वर्गीकरण करण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यात पुन्हा आचारसंहिता लागू शकते. अशातचं नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी स्विकारलेले देवेंद्र फडणवीस यांनी देखील लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांसह महापालिकांच्या निवडणुका लागतील, असं वक्तव्य केलं होतं. त्यामुळे अनेक राजकीय पक्षाचे इच्छुक उमेदवार स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांत आपलं नशीब आजमवणार आहे.



# शिक्षिका छाया शिंदे यांना वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार



❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**कल्याण :** वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळयाचे आयोजन नुकतेच करण्यात तुप्ती हॉल ठाणे येथे भारतीय जनता पार्टी कोकण विभाग यांचे कडुन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी सर्वांचे स्वागत केले यावेळी शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे निलीमा डावखरे शिक्षण क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस, स्वामी विवेकानंद संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कोस्तुभ गावडे,मनिष पाटील गायत्री पाटील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शैक्षणिक , सामाजिक ,राष्ट्रीय कार्यातील भरीव योगदानाबद्दल , शाळेतील भौतिक सुविधा ची पुर्तता, विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करण्याची प्रवृत्त करणे, विद्यार्थी ची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे,शाळेत विविध संस्थेकडून टि व्ही ,कॉम्प्युटर. स्पिकर मिळवणे त्याचा उपयोग अध्ययन अध्यापनात करणे या चांगल्या व उत्तम कार्याची दखल घेऊन जिल्हा परिषद शाळा चिरड या अंबरनाथ जिल्हा ठाणे येथील उपक्रमशील शिक्षिका सौ छाया पुंजाराम शिंदे यांना वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.केंदाकडुन, शाळेतील शिक्षकांकडून व गावातील ग्रामस्थ व पालकांकडून सर्व विद्यार्थ्यांकडून कौतुक सोहळा साजरा केला जात आहे त्यांचे कौतुक केले जात आहे

# म्हसा विद्यालयात डॉ बाबासाहेबांचा महापरिनिर्वाणदिन साजरा!



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ बाळासाहेब भालेराव

मुरबाड दि७. : मुरबाड तालुक्यातील येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल विद्यालय,म्हसा येथे आज भारतीय घटनेचे शिल्पकार,बोधिसत्व, महामानव, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाणदिन साजरा करण्यात आला. प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रमणी मोहिते यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.नंतर विद्यार्थी वक्त्यांची समायोचित भाषणे झाली.

' शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.'- हा मूलमंत्र दिला आणि समस्त मानव जातीला सामाजिक, समता आणि न्याय दिला . बहुश्रुत भारत निर्माण केला नि लोकशाही बळकट करुन समृद्धशील, मज़बूतपणा आणून सुजलाम-सुफलाम राष्ट्र निर्माण केले.अशा सुंदर लोकशाहीप्रधान राष्ट्र उभारणीत थोर पुरुषांचे काम हे कौतुकास्पद तथा वाखाणण्याजोगे आहे.-असे गौरवोदगार डॉ मोहिते यांनी व्यक्त केले. या प्रसंगी क्रीड़ाशिक्षक भानुदास लोहार यांनी तत्कालीन समाज जीवनावर आधारित कविता व गाणे सादर केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र बेंद्रे यांनी केले. या प्रसंगी विद्या बैरागी, धनश्री साबळे,सारीखा कडाळी,पूजा कुर्ले,सुनिल रेंघे,जगन्नाथ कथोरे, भानूदास घागस, राहुल प्रधान ,रमा पष्टे व समस्त विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.व वंदे मातरम गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्या पुढाकाराने
# डिवायडरमध्ये वृक्षारोपणाचा उपक्रम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली पूर्वेतील रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या डिवायडरवर अनेक गर्दूल्ले आणि मद्यपान करणारे लोकं बसत होती. यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना, महिलांना याचा त्रास सहन करावा लागत होता. डिवायडरवर बसणारी हि असमाजिक तत्वे मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आणि घाण करत होते. यामुळे स्टेशनपरिसरात बकालपणा येत होता. याबाबत गंभीर दखल घेत फ प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी स्टेशन परिसराच्या सुशोभीकरणासाठी स्थानिक दुकानदारांच्या सहकार्याने या डिवायडरमध्ये वृक्षारोपण केले आहे. वृक्षारोपणासहितच या डिवायडरला रंगरंगोटी देखील केली जाणार असून या झाडांभवती ग्रील देखील बसविण्यात येणार आहेत. यामुळे येथील झाडे टिकण्यास मदत होणार असून स्टेशन परिसराचे सौन्दर्य देखील वाढणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी दिली.

# रायगड जिल्ह्याची क्षयमुक्तीकडे वाटचाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ धनाजी घरत

**पेण :** रायगड जिल्हा १०० टक्के क्षयमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग आणि जिल्हा प्रशासन मिशन मोडवर कार्यरत आहे. प्रधानमंत्री टी.बी.मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्ह्यातील क्षयरुग्णांना पोषण आहार कीटची मदत देऊन किमान सहा महिन्यांसाठी दत्तक घेण्यासाठी जास्तीत जास्त संस्था, उद्योग संस्था-समुह, शासकीय अधिकारी, दानशूर व्यक्तींनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. तसेच या अंतर्गत जिल्ह्यातील ५ रुग्णाची जबाबदारी स्वीकारून ते जिल्ह्यातील पहिले 'निक्षय मित्र' बनले आहेत.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली क्षयरोग निर्मूलन मोहीमः १०० दिवसांचा विशेष कार्यक्रम अनुषंगाने आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीस जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे , जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. जाधव यांसह सर्व आरोग्य अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, टी.बी. च्या उपचार कालावधीत योग्य पोषण आहार मिळाला नाही तर रुग्णांना उपचार मिळूनही उपचाराचा सकारात्मक परिणाम दिसून येत नाहीत. सकस पोषण आहार मिळाल्यामुळे रुग्णांच्या औषधोपचारात खांड पडत नाही. नियमित विनाखांड औषोधोपचार घेतल्यामुळे रुग्णास पुढील टप्प्यातील टी.बी. होत नाही व तो रुग्ण वेळेत पुर्ण बरा होतो. त्यामुळे उद्योग संस्था, उद्योग समुह, दानशूर व्यक्ती यांनी निक्षय मित्र बनुन या अभियानात सहभाग नोंदवावा. टीबी रुग्णांना दिल्या जाणाऱ्या पौष्टिक आहार किटमध्ये तृणधान्ये, कडधान्ये, वनस्पती तेल, दूध पावडर, फळे, सुका मेवा इत्यादींचा समावेश होतो.

श्री जावळे पुढे म्हणाले आरोग्य विभागाने क्षयरोग रुग्ण शोधून त्यांच्यावर वेळीच उपचार करण्यासाठी मोहीम राबवावी, यासाठी तपासणीचे प्रमाण वाढवावे, खासगी रुग्णालयात क्षयरोग रुग्ण आढळल्यास त्यांच्यावर योग्य उपचार होतील याबाबत लक्ष द्यावे. आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी मोहिमेबाबत आवश्यक प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे, शहरातील झोपडपट्टी भागातही तपासणीचे प्रमाण वाढवावे. औद्योगिक संस्थांचे सहकार्य घेण्याबाबत लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

ग्रामपंचायत स्तरावर आणि शहरातील योग्य उपचार होतील याबाबत लक्ष द्यावे.सर्व क्षयरुग्णांना मोफत निदान, औषधोपचार यासह टीबी कार्यक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांचा लाभ दिला जावा. शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टानुसार क्षयरोग संशयितांचे टेस्टिंग वाढवावे. टीबी-एचआयव्ही ,टीबी-डायबिटीक समव्याधीग्रस्त रुग्णांचे तपासणीचे प्रमाण वाढवावे. जिल्ह्यातील १०० टक्के संमती दिलेल्या क्षयरुग्णांना पोषण आहार मिळण्यासाठी नियोजन करुन जास्तीत जास्त संस्था, दानशूर व्यक्ती यांना निक्षय मित्र बनण्यासाठी संपर्क करावा. क्षयमुक्त ग्रामपंचायत अभियानामध्ये निकष पूर्ण करुन जास्तीत जास्त ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवावा व क्षयमुक्त ग्रामपंचायत अभियानामध्ये जास्तीत जास्त गावे क्षयमुक्त होतील याचे नियोजन करावे, असे सांगून या कार्यक्रमांतर्गत कामकाजाबाबत आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांनी सूचना दिल्या. तसेच रायगड जिल्हा क्षयमुक्त करण्यासाठी सर्व यंत्रणानी मिशन मोडवर काम करावे असे निर्देश श्री जावळे यांनी दिले.

> क्षयमुक्त ग्रामपंचायत अभियानामध्ये निकष पूर्ण करुन जास्तीत जास्त ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवावा व क्षयमुक्त ग्रामपंचायत अभियानामध्ये जास्तीत जास्त गावे क्षयमुक्त होतील याचे नियोजन करावे, असे सांगून या कार्यक्रमांतर्गत कामकाजाबाबत आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांनी सूचना दिल्या. तसेच रायगड जिल्हा क्षयमुक्त करण्यासाठी सर्व यंत्रणानी मिशन मोडवर काम करावे असे निर्देश श्री जावळे यांनी दिले.



# मांडा टिटवाळा परीसरातील मुलभूत समस्या सोडविण्यासाठी पालिका आयुक्तांना निवेदन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

मांडा टिटवाळा परीसरातील मुलभूत समस्या तसेच विविध विकासकामांच्या संदर्भात शिवसेनेचे उपशहरप्रमुख विजयभाऊ देशेकर यांनी क.डो.म.पा आयुक्त इंदुराणी जाखड यांची भेट घेऊन प्रामुख्याने मांडा टिटवाळा परीसरातील अंतर्गत रस्ते, RK नगर, मायफेअर गृहसंकुल ते मुख्य रस्ता, सिध्देश्वर कॉ मांडा वेस्ट रस्ता, MMRDA कडे पाठवलेले प्रस्ताव, जुने पुर्नविकास प्रकल्पासाठी २१० अंतर्गत रस्त्यांची वाढ, इंदिरानगर पाणी प्रश्न व स्मशानभूमी डागडुजी तसेच बोअरवेल, फेरीवाला धोरण, बालउद्यान रस्ता,उंच इमारतींच्याबाबत अग्निशमन विभाग सुविधा अद्यावत करणे, जुने कंपाऊंड वॉलवर तैलचित्रे साकारणे, स्वामी समर्थ मठ Dg वन रस्ता डांबरीकरण, ट्रॅफिक कंट्रोलसाठी वार्डन नेमणुक, स्वामी विवेकानंद ते वाजपेयी चौक - रेल्वे स्टेशन एकेरी वाहतूक करणे अशा विविध समस्यांवर विस्तुर्त चर्चा करुन जाखड मॅडमच्या कार्यकाळात रोड लाईट व रस्त्यांची चांगली कामे होत असल्याने शाल देऊन सन्मान देखील करण्यात आला.यावेळी शहर अभियंता अनिता परदेशी मॅडम, कार्यकारी अभियंता बांधकाम जगदीश कोरे साहेब, शाखाप्रमुख अशोक चौरे, सामाजिक कार्यकर्ते संदिपशेठ मिश्रा, नरेंद्र पाटील, आकाश गुंजाळ उपस्थित होते.

> मी मांडा टिटवाळावासियांना आजच्या बैठकीच्या अनुषंगाने विकासाचे वारे सुरु झाले असुन लवकरच एक एक काम मार्गी लावणार असे आश्वासित करतो.
>
> **- विजय(भाऊ) मारुती देशेकर , शिवसेना उपशहरप्रमुख कल्याण**

# ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मोफत पाणी वाटप व बिस्कीट वाटप




ऋषीकेश जाधव
☐ दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर / दिप संदेश मंडळ देवळे या मंडळाच्या माध्यमातून मंडळाचे अध्यक्ष दिनेश साळवी यांच्या अध्यक्षतेखाली महामानव विश्वभूषण भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथे जगभरातून येणाऱ्या तमाम भीम अनुयायांना मोफत पाणी व बिस्कीट वाटप करण्यात आले. दीप संदेश मंडळ देवळे या मंडळाच्या माध्यमातून सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी राबविण्यात येत असतात. त्यासाठी मंडळ कमिटी सदैव तत्पर असते. आणि त्यामुळे त्यांचे समाजात व देवळे पंचक्रोशीत कौतुक होत आहे. मंडळ असेच क्रियाशील राहो अशा कौतुकास्पद शुभेच्छा येत आहे.

# टिटवाळा : भटक्या कुत्र्यांच्या हल्लयात महिला गंभीर जखमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

**कल्याण :** टिटवाळा येथे एका गृहसंकुलाच्या परिसरात शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास भटक्या श्वानांनी केलेल्या हल्ल्यात एक साठ वर्षाची महिला गंभीर जखमी झाली. या महिलेची प्रकृती चिंताजनक झाल्याने तिला मुंबईतील जे. जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या महिलेची ओळख पटलेली नाही. ही महिला भिक्षेकरी किंवा कचरा वेचक असण्याची शक्यता प्रत्यक्षदर्शींकडून व्यक्त केली जात आहे. टिटवाळयातील रिजन्सी सर्वम गृहसंकुलाच्या मागील बाजुस शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास ६० वर्षाची एक महिला पायी चालली होती. या महिलेला पाहून या भागातील चार भटके श्वान तिच्या अंगावर धाऊन आले. चारही श्वानांनी एकावेळी या महिलेवर हल्ला केल्याने महिला जमिनीवर कोसळली. भटक्या श्वानांनी महिलेचे कपडे, तिच्या शरीराला चावे घेऊन तिला घायाळ केले. या महिलेने सुरूवातीला भटक्या श्वानांच्या तावडीतून सुटण्यासाठी प्रयत्न केले. एकचवेळी चारही श्वान आक्रमकपणे महिलेवर हल्ला करत असल्याने तिला उठणे शक्य झाले नाही.

या हल्ल्यात गंभीर जखमी झालेली महिला घटनास्थळीच बेशुध्द झाली. भटक्या श्वानांनी या महिलेला ओढत गृहसंकुलाच्या दिशेने नेले. महिलेची श्वानांशी प्रतिकार करण्याची शक्यती संपल्याने ती निपचित पडून होती. परिसरातील काही रहिवाशांना, गृहसंकुलाच्या रखवालदारांना या घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी धाऊन आले. त्यावेळी श्वानांनी त्या महिलेला सोडून पळ काढला. जागरूक नागरिकांनी तातडीने या महिलेला रुग्णवाहिकेकडून गोवेली येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.


या महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याने तिच्यावर गोवेली रुग्णालयात प्राथमिक उपचार करून उल्हासनगर येथील मध्यवर्ति रुग्णालय, तेथून कळवा येथील शासकीय रूग्णालय येथे पाठविण्यात आले. या महिलेची प्रकृती चिंताजनक झाल्याने तिला मुंबईतील जे. जे. रुग्णालयात अधिकच्या उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

> **टिटवाळात श्वानांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर गोवेली शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना अधिकच्या उपचारासाठी जे. जे. रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. साठ वर्ष वयाच्या या महिलेची ओळख पटलेली नाही. डॉ. दीपलक्ष्मी कांबळे वैद्यकीय अधिकारी, गोवेली शासकीय रुग्णालय. कल्याण.**

# अथश्री आणि गायत्री देणार का लग्नासाठी होकार ?
## लग्नाची नवी परिभाषा सांगणारा 'हॅशटॅग तदेव लग्नम'चा जबरदस्त ट्रेलर प्रदर्शित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शुभम फिल्म प्रॉडक्शन प्रस्तुत 'हॅशटॅग तदेव लग्नम' चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, ट्रेलर पाहून या चित्रपटाबद्दलची प्रेक्षकांच्या मनातील उत्सुकता आता प्रचंड वाढली आहे. खरंतर टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आल्यापासूनच या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांच्या मनात कुतूहल होते. 'लग्न'संस्थेबाबतचे आधुनिक काळाचे विचार अतिशय हलक्याफुलक्या आणि मजेशीर पद्धतीने या चित्रपटात मांडण्यात आल्याचे टिझरमध्ये दिसत होते. आता ट्रेलर पाहून या चित्रपटाच्या दुसऱ्याही अनेक बाबी समोर आल्या आहेत. या सगळया गोष्टी असतानाच 'हॅशटॅग तदेव लग्नम'च्या निमित्ताने सुबोध भावे



आणि तेजश्री प्रधान ही जोडीही पहिल्यांदाच पडद्यावर झळकणार आहे. याव्यतिरिक्त यात प्रदीप वेलणकर, मानसी मागिकर, संजय खापरे, शर्मिष्ठा राऊत यांच्याही भूमिका आहेत. त्यामुळे एकंदरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनात घर करणार असल्याचे दिसतेय.आनंद दिलीप गोखले लिखित, दिग्दर्शित या चित्रपटाचे शेखर विठ्ठल मते निर्माते आहेत. ट्रेलरमध्ये अथश्री आणि गायत्री ही दोन परस्पर विरोधी व्यक्तिमत्वं त्यांच्या लग्नासाठी एकमेकांना पहिल्यांदा भेटताना दिसत असून या दरम्यान काही गंमतीशीर घटना घडताना दिसत आहेत. दोघांचे विचार एकमेकांसोबत शेअर करत असतानाच त्यांच्या आयुष्यातील काही रहस्येही समोर येत आहेत. त्यामुळे यात धमाल तर आहेच तसेच काही ट्विस्टही अनुभवायला मिळणार आहेत. या सगळयातून अथश्री आणि गायत्री यांचे लग्न होणार का? हे पाहाण्यासाठी प्रेक्षकांना २० डिसेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शक आनंद दिलीप गोखले म्हणतात, 'आजच्या काळात लग्न करताना एकमेकांत बघितल्या जाणाऱ्या गोष्टींवर प्रकाश टाकणारा हा चित्रपट आहे. लग्न करताना आता तरुणांची विचारसरणी बदलली आहे, त्यांचा लग्नाकडे पाहाण्याचा दृष्टीकोन खूप वेगळा झाला आहे. हा सिनेमा तरुणांना विशेष जवळचा वाटेल. असे असले तरी संपूर्ण कुटुंबाने एकत्र पाहावा, असा हा चित्रपट आहे. यात मजा, धमाल तर आहेच प्रसंगी प्रेक्षकांना हळवाही बनवेल. कथानकात सुबोध आणि तेजश्रीच्या जबरदस्त अभिनयाने अधिकच रंगत आणली आहे.''

> ''विषय थोडा नाजूक असला तरी अतिशय मजेशीर पद्धतीने तो यात मांडण्यात आला आहे. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच आवडेल.''
>
> **- शेखर मते - निर्माते**

## दैनिक राशिफल
रविवार
०८ डिसेंबर २०२४

**मेष**
आजचा दिवस आनंदाचा दिवस असेल.शिक्षण क्षेत्राशी संबंधित लोकांना आज काहीतरी नवीन शिकण्याची संधी मिळेल. नोकरी करणाऱ्यांना आज बढती मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभ**
वैवाहिक जीवनातील अडथळे दूर होतील. आज समाजात तुमची प्रतिष्ठा वाढेल. ऑफिसमधील सर्वजण तुमच्या कृतीने प्रभावित होतील. या राशीच्या महिलांना

**मिथुन**
आज तुम्ही छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद मिळवण्याचा प्रयत्न कराल. आर्थिक स्थिती मजबूत होईल.आज तुमचे आरोग्य चांगले राहणार आहे. घरातील वडीलधारी मंडळी आज तुम्हाला उत्तम

**कर्क**
महिलांवर आज ऑफिसमध्ये कामाचा ताण कमी असेल.तुमचे आरोग्य चांगले राहील.
आज तुमचा दिवस संमिश्र जाणार आहे. आज कोणत्याही अनोळखी

**सिंह**
आज व्यवसायात लाभाची चांगली शक्यता आहे.आज एखादा नातेवाईक तुम्हाला तुमच्या घरी भेटायला येईल. आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला

**कन्या**
सल्ले देतील.
आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. विद्यार्थ्यांना आज काहीतरी नवीन शिकण्याची संधी मिळेल. आज तुम्हाला तुमच्या मोठ्या भावाचे सहकार्य

**तुळ**
व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. विद्यार्थ्यांना आज अभ्यासात अधिक मेहनत करावी लागेल आणि चांगले परिणाम मिळतील.व्यवसायातील अडचणी दूर होतील.

**वृश्चिक**
जाणार आहे. काही महत्त्वाच्या कामामुळे आज तुम्हाला ऑफिसमध्ये उशिरा थांबावे लागेल. जर तुम्हाला कुठेतरी पैसे गुंतवायचे असतील तर आजचा

**धनु**
मिळेल. कोर्टाशी संबंधित समस्या सुटतील. आईचे आशीर्वाद घ्या.नशिबाची साथ मिळेल. आजचा दिवस आनंदाने भरलेला असेल आजचा दिवस तुमच्या कामात यश मिळवून देईल. आज तुम्ही

**मकर**
आजचा दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे. स्वतःला आर्थिकदृष्ट्या मजबूत बनवण्यासाठी तुम्ही योजना कराल. तुमच्या जोडीदारावर पूर्ण विश्वास ठेवा, संबंध अधिक घट्ट होतील.

**कुंभ**
दिवस चांगला आहे.कुटुंबातील सदस्यांशी काहीतरी चर्चा कराल आणि त्यावर विचार कराल. आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे.

**मीन**
खूप भावनिक होण्याचे टाळावे. तुमचा जोडीदार आज तुमचे म्हणणे समजून घेण्याचा प्रयत्न करेल. आज तुम्ही कठीण परिस्थितीतही अचूक निर्णय घ्याल.कौटुंबिक संबंध दृढ होतील.



# पांढऱ्या कांद्याचे क्षेत्र १ हजार हेक्टर करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील

## - जिल्हाधिकारी किशन जावळे



**दै. ठाणे जीवनदिप वार्ता**

**पेण :** हवामान आणि विविध समस्यांमुळे शेती उत्पादकता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करून शेतकऱ्यांना शिक्षित करणे ही काळाची गरज आहे.शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान व बँकांचे सहकार्य यांच्या मदतीने शेतीत आवश्यक ते बदल करून उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. . रायगड जिल्ह्यातील पांढऱ्या कांद्याचे क्षेत्र १ हजार हेक्टर करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

बँक ऑफ बरोडाच्या वतीने दि. २५ नोव्हेंबर पासून रायगड जिल्ह्यात किसान पंधरवडा राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शेतकरयांना धनादेश वाटप आणि माहितीसत्रांचे आयोजन क्षत्रेय समाज हॉल कुरुळ येथे करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, जी. एस हरलया, सहा.आयुक्त मत्स्य व्यवसाय, संजय पाटील,रिजनल मॅनेजर नवी मुंबई, मनीष कुमार सिन्हा, एन डी जि एम,मुंबई विभाग मनोज गुप्ता यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

श्री जावळे म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था कृषीवर अवलंबून आहे. कोरोना संसर्गाच्या काळात देशातील सर्व क्षेत्रांचा विकास दर घटला होता. शेती क्षेत्र हे एकमेव असं क्षेत्र होतं ज्या क्षेत्रानं विकासदरात वाढ नोंदवली होती. शेतकरी पारंपारिक पिकांसोबत फळ आणि फुलशेतीकडे वळला आहे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे दिवस डाळिंब, द्राक्षे शेतीमुळं बदलले. परदेशी फळं, भाज्यांची लागवड राज्यातील शेतकरी करु लागलेत. शेतीच्या जोरावर अनेक कुटुंबांनी प्रगती साधली. आपलं राज्य नेहमीच प्रागतिक गोष्टींचा स्वीकार करतं आणि त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी ओळखलं जातं. शेती क्षेत्रातील संशोधकांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत शेतकऱ्यांनी श्रमाची बचत केलीच त्यासोबत वेळेची बचत देखील होत गेली. शेतकऱ्यांनी कालानुरूप शेतीत बद्दल करायला हवा.

राज्यातील शेतकरी नवनवे प्रयोग करत असून शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यामातून आपल्या जिल्ह्याचा विकास साधला पाहिजे. येथील वातावरण, पाऊस , जमिनीची प्रतवारी लक्षात घेऊन आपल्या पीक पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची आवशयकता आहे. रायगड जिल्ह्यात बंदर आणि विमानतळ आहे. त्यामुळे आंतराराष्ट्रीय बाजारपेठ देखील उपलब्ध होऊ शकते. या सर्व बाबींचा विचार करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीत नवीन प्रयोग राबवावेत असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

आजच्या युगात शेतकऱ्यांनी शेडनेट व पॉलिहाऊसच्या माध्यमातून विविध पीके घेण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.यासाठी बँकेचे योगदान हे मोठे असणार आहे. बँक ऑफ बडोदा ने किसान पंधरवड्याच्या माध्यमातून जिल्ह्यात ३१ कोटी रुपयांची प्रकरणे मंजूर केली आहेत ही आनंदाची बाब आहे. या कार्यक्रमाचा उद्देश हा योजनांची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी अशी आहे. सर्व पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी बँकांच्या योजनांचा लाभ घ्यावा असे अवाहन त्यांनी यावेळी केले.

बँक ऑफ बडोदाने आपले मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात देखील उल्लेखनीय कामगिरी केली आहे याबद्दल जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी त्यांचे कौतुक केले. बँक आपल्या ग्राहकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत आहे असे सांगितले.

बँक ऑफ बडोदाने शेतकऱ्यांसाठी किसान पंधरवड्याचे आयोजन केले असून, त्याअंतर्गत शेती क्षेत्रातील कर्जाचे प्रमाण वाढवण्याचा आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा उद्देश आहे.कृषी क्षेत्रात बँकिंग आणि तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देताना संपूर्ण भारतातील शेतकरी आणि ग्रामीण समुदायांशी संपर्क साधण्याचा बँकेमार्फत प्रयत्न केला जातो असे मनीष कुमार सिन्हा यांनी प्रास्ताविकात सांगितले.

यावेळी सहा.आयुक्त मत्स्य व्यवसाय, संजय पाटील आणि एन डी जि एम,मुंबई विभाग मनोज गुप्ता यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पात्र बचतगट व शेतकरी लाभार्थ्यांना जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते धनादेश वाटप करण्यात आले.

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रवींद्र शिंदे यांनी केली वाडा तालुक्यातील नरेगा च्या कामांची पाहणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

पालघर/ वाडा येथील रवींद्र शिंदे,मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर, यांनी वाडा तालुक्यात भेट देऊन नरेगाच्या कामांची पाहणी केली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा) अतुल पारसकर, गटविकास अधिकारी पं.स.वाडा, यांच्या सोबत पाहणी करून उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना केल्या. यावेळी ग्रामपंचायत मांडवा अंतर्गत सुरु असलेल्या अ९-गवळी पाडा,बाळा कडु यांच्या शेताजवळील बंधाऱ्यातील गाळ काढणे या कामाला भेट दिली.सदर कामावर १४८ मजुर उपस्थित होते. या भेटी दरम्यान रवींद्र शिंदे यांनी मजुरांची विचारपुस केली, आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच पं.स.वाडा,ग्रामपंचायत परळी अंतर्गत सुरु असलेल्या ए-कदल नाला सरळीकरण करणे,या कामाला भेट दिली. या कामावर उपस्थित असलेल्या ११८ मजुरांसोबत चर्चा करून मजुरांची विचारपुस केली,तसेच त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. मजुरांनी सांगितलेल्या अडचणी सोडवण्यासाठी उपस्थित अधिकाऱ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मार्गदर्शक सूचना केल्या. यावेळी पं.स.वाडा, उपअभियंता बांधकाम,विस्तार अधिकारी पं.स.वाडा,सहायक कार्यक्रम अधिकारी (नरेगा), तांत्रिक अधिकारी (नरेगा) उपस्थित होते.



# अंबिका नगर मित्र मंडळाची आश्रम शाळेला शैक्षणिक साहित्याची मदत



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

कल्याण : अंबिका नगर मित्र मंडळाने जय बजरंग शिक्षण मंडळ संचालित कै. निर्मला देवी दिघे आश्रम शाळा, कात्रपपाडा इथे भेट देऊन शालेय शैक्षणिक साहित्य दिले. दरवर्षी अंबिका नगर, बेलवली, येथे नवरात्रौत्सव खूप उत्साहाने साजरा केला जातो. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ह्या भावनेने 'समाजकल्यानासाठी एक वही एक पेन' ही संकल्पना रबावण्याचा निर्धार ह्यावर्षी केला व सगळे देवी भक्तांना विनंती केली की दर्शनाला येताना स्वइच्छेने समाजकल्यानासाठी एक वही व एक पेन आणावी. अनेक देवी भक्तांनी १ /२ डझन ते २ डझन वह्या देखील आणल्या. अशा प्रकारे एकूण ३२ डझन व्ह्या, १५ डझन पेन, ५ डझन पेन्सिल, ३ डझन रजिस्टर वह्या, २० स्केचपेन सेट, एक डझन पाउच जमा झाले.

कै. निर्मला देवी दिघे आश्रम शाळा, कात्रपपाडा इथे एकूण १०५ विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी खूप कष्ट करून शिक्षण पूर्ण करतील आणि येणाऱ्या काळात समाजासाठी योगदान देतील अशी आशा बाळगत अंबिका नगर मित्र मंडळाने ही मदत देण्याचा निर्धार केला. याप्रसंगी अंबिका नगर मित्र मंडळाचे अध्यक्ष, इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आमदार किसन कथोरेंना मंत्रीपद द्यावे कुणबी समाज संघटनेची मागणी!

**मुरबाड-प्रतिनिधी :**

सतत पाच वेळा आमदारकी भुषवणारे मुरबाड विधानसभेचे विकास पुरूष आमदार किसन कथोरेंचा मंत्री मंडळात समावेश करून कॅबिनेट मंत्रीपद द्यावे अशी मागणी कुणबी समाज संघटना मुरबाड, शहापूर, कल्याण, बदलापूर अशा अनेक कुणबी समाज संघटनांनी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



ठाणे जिल्हासह संपूर्ण कोकणात कुणबी समाज मोठ्या संख्येने विखुरलेला आहे. किसन कथोरे हे कुणबी समाजाचे कणखर नेतृत्व मानले जातात.स्व.शांताराम घोलप साहेबांच्या नंतर राज्याच्या मंत्रीमंडळात कुणबी चेहरा कुठेच दिसला नाही. किसन कथोरे हे विकासाची दुरदृष्टी असणारे सर्व समावेशक असे नेतृत्व आहे. तब्बल पाच वेळा ते विधानसभेवर निवडून आले असल्याने भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी स्थापन होणार्या मंत्री मंडळात घेतल्यास कुणबी समाजाह सर्व घटकांना न्याय मिळेल.त्यांच्या हुशारीचा फायदा राज्याला होऊन खर्या अर्थाने मुरबाड करांचे स्वप्न साकार होईल.हे सर्व पाहता भाजपा पक्ष श्रेष्ठिंनी जनभावनेचा विचार करून किसन कथोरेंचा मंत्री मंडळात समावेश करावा अशी ठोस मागणी कुणबी समाजासह सर्व समाज घटक करत आहेत.

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट आणि पोटगी, नावात बदल बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

कार्यालय - 9619188558 ■ +91 9158078601
ईमेल- jeevandeepvartanews2020@gmail.com

# 'बोलता बोलता'
# सूत्रसंचालन निवेदन क्षेत्रातील मार्गदर्शक गुरुकिल्ली

व्यासपीठावरील सूत्रसंचालन,निवेदनातील अत्यंत वैविध्यतेचे बारकावे टिपून या क्षेत्रामध्ये करिअर करणाऱ्या नवोदितांसाठी महेंद्र कोंडे लिखित, 'बोलता बोलता' हे पुस्तक आत्मविश्वास निर्माण करणारे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वांमध्ये समृद्धी आणणारे एक दीपस्तंभ ठरेल असे हे पुस्तक आहे. अशा पुस्तकाची निर्मिती करताना लेखकाने त्यांच्या गेल्या अनेक वर्षापासूनच्या विविध पद्धतीच्या कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष अनुभवातून, या पुस्तकाची निर्मिती ही केवळ अशा क्षेत्रातील मंडळींना आपल्या ओघवत्या भाषाशैली व सरळ - सोप्या शब्दात मांडून, नवोदितांना हे पुस्तक मार्गदर्शक ठरले आहे. आजवर याबाबत अद्याप तसे पुस्तक उपलब्ध नसल्याने, या पुस्तकाच्या उपलब्धतेमुळे नवोदितांना एक महत्त्वाची गुरुकिल्ली प्राप्त झालेलीआहे, यावरून पुस्तकाची उपयुक्तता व व्यापकता हे नक्कीच या क्षेत्रामध्ये येऊ पाहणाऱ्यांना अत्यंत मोलाची आणि दिशादर्शक मार्गदर्शक दीपस्तंभ सारखीच आहे.




**लेखक** - महेंद्र कोंडे

**प्रकाशक** - व्यास पब्लिकेशन हाऊस

**किंमत** - रू.३२५/-

**पुस्तक का वाचावे** - सूत्रसंचालन व निवेदकांसाठी अत्यंत उपयुक्त मार्गदर्शक दीपस्तंभ.

**पुस्तकाचा दर्जा** - *** उत्तमच.

**पुस्तकाचे महत्व** - नव्याने या क्षेत्रामध्ये येऊ पाहणाऱ्यांना यातील बारकावे अभ्यासून करिअर करण्यास सहाय्य करतो.

**परीक्षण / लेखन** - सुनील धाऊ झळके
sss.sz99@gmail.com

वाद्यवृंद,बैठकीचे - उभ्याने निवेदन करणे, विविध स्वरूपाचे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन,आकाशवाणी दूरदर्शन ,एफ एम वाहिन्या, ऑनलाइन कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांतील श्रोते आणि मान्यवरांच्या मधला महत्त्वाचा दुवा हा त्या त्या कार्यक्रमाचा सूत्रसंचालक, निवेदक असतो.त्याची ओघवती भाषाशैली मोजके शब्द आणि कार्यक्रमाचे विषय स्वरूप पाहता त्याचे निरीक्षण त्यादृष्टीने कार्यक्रमासंदर्भात केलेला अभ्यास उपस्थित मान्यवरांची ओळख त्यांचा योग्य तो आदर राखून उचित सन्मान करणे,कार्यक्रमाचे शिष्टाचार इत्यादीचे भान ठेवणे, त्याची संबंधितांशी चर्चा करून कार्यक्रमाची रूपरेषेद्वारे एक सुंदर संहिता तयार करून कार्यक्रम रंगतदारपणे नेऊन उपस्थित स्रोत्यांची आवड, जिज्ञासा पाहून कार्यक्रमाची यशस्वीता वाढविण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी ही सूत्रसंचालक अथवा निवेदकाची असते.निवेदकाची एक चूक ही कार्यक्रमाची दशा आणि दिशा बदलवते त्यासंदर्भात लेखकाने आपल्या या पुस्तकांमध्ये सेहेचाळीस प्रकरणातून उत्तमपणे ,प्रत्येक बारकाव्यांसह मांडीत मार्गदर्शन केलेले आहे.त्यामुळे सूत्रसंचालक, निवेदकच नव्हे तर व्यासपीठावरून बोलणाऱ्यांना विद्यार्थी ,शिक्षक, प्राध्यापक आरजे डबिंग कलाकार पत्रकार संवादक मुलाखतकार अशा प्रत्येकालाच 'बोलता बोलता' हे पुस्तक परिश स्पर्शासारखे वाटावे इतके सुंदर असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

लेखक महेंद्र कोंडे यांचे वर्तमानपत्रातील सदरामध्ये या संदर्भातील अभ्यासपूर्ण लेख छापून आल्यानंतर त्याच दिवशी याचे रूपांतर पुस्तकांमध्ये व्हावे असा दृढ निश्चय करणारे त्यांचे बालमित्र, प्रकाशक निलेश गायकवाड व त्यांच्या पत्नी वैशाली निलेश गायकवाड यांनी, जसे महर्षी व्यास यांनी वेदांचे विभाजन करून, वेद टिकवले, त्यांचे अध्ययन व संशोधन करून पुनर्जीवीत , पुनर्निर्माण केले,वैदिक साहित्याची निष्ठा उभी केली याच उद्देशाने हेच साध्य करण्यासाठी अशा निमित्ताने सूत्रसंचालन,निवेदनातील तंत्रमंत्र नवोदितांकरिता या पुस्तकाची निर्मिती , व्यास पब्लिकेशन हाऊस द्वारे ,त्यांच्या कल्पनाशक्तीचा सृजन अविष्कार करून प्रकाशन करावे हे या क्षेत्रातील नवोदित व्यक्तींना प्रकाशन संस्थेच्या नामसाधर्म नुसार व्यास आणि व्यासपीठ यांचा अनोखा संगम या पुस्तकाच्या माध्यमातून नक्कीच अनुभवास मिळतोय. एक परिपूर्ण पुस्तक रुपी साहित्य वाचनासाठी उपलब्ध करून दिलेले आहे. पुस्तकास प्रसिद्ध साहित्यिक गीतकार प्रवीण दवणे सर यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, ' निवेदन सूत्रसंचालन क्षेत्रातील वैविध्य टिपणारे महेंद्र कोंडे लिखित बोलता बोलता हे पुस्तक यशस्वी निवेदनाचे पाठ्यपुस्तक ठरलेले आहे ते वाचून अभ्यासून आणखीन आठ ते दहा वर्षांनी चांगल्या निवेदकांची फळी महाराष्ट्रात निर्माण झाली तर आश्चर्य वाटायला नको',यावरून या पुस्तकाची साहित्यिक किंमत व महत्त्व प्रस्तावनेच्या वाचनानंतर कळते.त्यामुळे पुस्तकास अनन्य साधारण महत्व प्राप्त होते.यानिमित्ताने मराठी साहित्यात आणखीन एक नव्या पुस्तकाची भर पडणे ही वाचक व व्यासपीठ गाजवणाऱ्यांसाठी पर्वणी आहे.पुस्तकाचे मुखपृष्ठ असे विषयाला धरून साजेसे असेच झालेले आहे.

लेखक हे नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये जनसंपर्क अधिकारी आहेत, त्या निमित्ताने त्यांनी अनेक शासकीय कार्यक्रमाचे नियमित निवेदन सूत्रसंचालन केलेले आहे.याचबरोबर सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, शैक्षणिक अशा नानाविध अनेक संस्थांच्या विविध स्वरूपाच्या कार्यक्रमांच्या आयोजनामध्ये पुढाकाराने सूत्रसंचालन केले आहे. याव्यतिरिक्त त्यांनी वाद्यवृंद ,आर्केस्ट्रांचे निवेदन निरूपणही केले आहे .अनेक प्रकट मुलाखती घेतल्यात.शास्त्रीय संगीताचा आधार असलेल्या बैठकी ,मैफिलीनतून ते थेट लोकगीते- कोळीगीतांसारख्या गीत ,नृत्य ,वाद्यवृंदांचे निवेदन क्रिकेटचे समालोचक पासून कवी संमेलन, भक्ती गीतांच्या निरूपणापासून ते लावणी - तमाशाच्या सूत्रसंचालनापर्यंत अशा एक ना अनेक क्षेत्रातील वैविध्यपूर्ण दांडगे अनुभव अनुभवताना, त्यांचे अनुभव अत्यंत प्रभावशाली आणि प्रगल्भ झाले आणि त्यांच्या याच बहुआयामी प्रगल्भ अनुभवातून साकारलेले हे पुस्तक बाजारात उपलब्ध होत असताना वाचकांना तसेच सूत्रसंचालन , निवेदन क्षेत्रामध्ये येऊ पाहणाऱ्या नोदितांना हमखास यशाची गुरुकुल्ली ठरतो आहे,सर्वांना समृद्ध करू पाहतो आहे. अस्मदकांनी पाच दशके अशा प्रकारची विविधतेने बहरलेली मुसाफिर केल्याने या लेखनाशी आपले सूर लगेचच जुळतात, असं पुस्तक वाचताना प्रचिती येते.

कोणताही कार्यक्रम सुंदर ,मनोरंजक होण्यासाठी सूत्रसंचालक, निवेदक हा महत्त्वाचा दुवा आणि कार्यक्रमाच्या यशस्वीतेचा कणा असतो. त्याची स्वतंत्र अशी ओळख असते. बोलणं ही कला साध्य करता, कमी परंतु मोजक बोलणं मात्र इतरांना ते ऐकावसं वाटेल इतपत बोलणं हे एक चांगल्या सूत्रसंचालक , निवेदकांचे चांगलं लक्षण असतं.कलाकार, मान्यवर, श्रोते यांच्या मधला रंजक दुवा तोअसतो. व्यासपीठावर बोलताना त्याने कोणतीही भीती दडपण न घेता, आत्मविश्वासाने बोलण्यासाठी घरातील आरशासमोर ,मंडळींसमोर बोलण्याची सवय करून अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून बेधडकपणे ,अभ्यासपूर्ण नियोजनबद्धतेने कठीण ते सोपं करून बोलायला हवं. चांगल्या वक्त्यांपेक्षा एक चांगला श्रोता होणं कसं आवश्यक आहे, कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे, अतिथींचे परिचय म्हणजे महत्त्वाचं काम हे आधारभूत ठेवून, शब्दबद्ध करीत सुवर्णमध्ये साधून यथोचित मान सन्मान राखणे गरजेचे असते.प्रत्येकाचा प्राप्त झालेला आवाज उत्तमपणे उपयोग करून आवाजातील चढ-उतार आणि अभ्यासपूर्ण, आकर्षक बोलण्याची जोड दिल्यास सूत्रसंचालक, निवेदकाची यशस्विता अवलंबून असते. माइकवर बोलणे ही कला सरावानेच येते. परंतु बोलताना माइक पासून तोंडाच्या अंतराचे ही भान ठेवल्यास माईक कसा पकडावा,बोलताना हात वारे कसे असावेत हे नियम निवेदकाने पाळणे गरजेचेच. कार्यक्रमांनुरूप पोशाखांचे वैविध्य हे कार्यक्रमाची असलेली बांधिलकी व समरसता दाखवते.निवेदकाची देहबोली इत्यादी बाबी कार्यक्रमाच्या यशस्वीतेची गुरुकिल्ली असते.शुद्ध बोलणे ही नित्याची सवय कार्यक्रमाचा आधार ठरते. आपली भाषाशैली मधुर, रसाळ,विनयशीलपणे वक्ता व श्रोत्यांना जोडणारी असावी. निवेदन खुमासदार व प्रभावीपणे होण्यासाठी वाचलेले विनोद, सुभाषिते, चमकदार वाक्य, म्हणी श्लोक, काव्यपंक्ती, शेरोशायरी इ.खजिन्यांच्या, आठवणींचा योग्य वेळी कसा वापर करावा, कार्यक्रमातील कठीण प्रसंगात निवेदकाने त्याच्याकडील हातोटीने,वाचनाने ,पाठांतराने ,

प्रसंगावधान राखून खुबीने मार्ग कसा काढावा.हजरजबाबीपणातील कोपरखळ्या कशा पद्धतीने माराव्यात याची समय सूचकताही कशी साधायची,कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार आपापली संहितेची तयारी करणे अशा नानाविध बारीक-सारीक तपशीलांसह लक्ष ठेवण्याची जबाबदारी ही निवेदक किंवा सूत्रसंचालकाची असून प्रसंगी तोल सांभाळून कार्यक्रमाचे ताल सांभाळण्याचीही त्याच्या मनाची तयारी असायला हवी.कार्यक्रमाची सुरुवात ते कार्यक्रमाचा शेवट होईपर्यंत सूत्रसंचालकाने सतर्क राहून कार्यक्रमाच्या रंजकतेचे आलेख चढतेच ठेवणे अत्यंत गरजेचे व तितकेच महत्त्वाचे असते. अशा अनेक सूक्ष्म व लहान सहान गोष्टींच्या उहापोहाद्वारे लेखकाने पुस्तकातील नमूद प्रकरणातून 'बोलता बोलता'शिकवत जात असल्याचे पुस्तक वाचताना दिसते.

सूत्रसंचालन,निवेदन एवढेच नाही तर सूत्रसंचालकाने प्रभावीपणे आणि अभ्यासपूर्ण बोलण्याच्या या क्षेत्रामध्ये आपल्या अनुभवाच्या संचितावर कार्यक्रमाचे विषय ,त्याचे व्यापकता व महत्त्व समजून उपस्थित मान्यवर, श्रोत्यांना आपल्या मधुर, संयम, मोजक्या शब्द संपदेच्या भंडाराची उधळण करीत मध्यस्ताची किंवा दोघांमधला दुवा होण्याची मिळालेल्या संधीच सोनं करण्याची मोठ्या जबाबदारीचं शिव धनुष्य पेलावं लागणं ही खरी कसरत ठरते, व्यासपीठावरील कार्यक्रमाप्रमाणे निवेदकाला तारतम्य बाळगून , सूत्रसंचालक म्हणून उपस्थित मान्यवर व रसिकांवर छाप पाडायची असते, त्यामुळे उत्तम निवेदनाद्वारे कार्यक्रम सतत प्रवाही राहतो. वक्त्यांच्या भाषणातील महत्त्वाच्या ओळींचे सार मोजक्या व ऑटोपशीरपणे शब्दात मांडल्यास बऱ्याचदा रसिकांची दाद मिळून जाते. कार्यक्रमाच्या रूपरेषेनुसार कार्यक्रमाचा प्रवाह व त्याची माहिती सूत्रसंचालक आपल्या निवेदनातून देत असल्याने, तो आपल्या निवेदनाद्वारे कलाकृतीचा आस्वाद घेण्यासाठी उपस्थितांचे मन तयार करतो.त्यामुळे सुसंगत बोलणे आणि रसिकांच्या रसिक मनाला आपल्याकडील प्रभावशाली शब्दांची भुरळ पाडण्याच्या त्याच्याकडील या सुप्त कलेने रसिकांची मने तो जिंकतो. इथूनच त्याचा यशस्वीतेचा प्रवास सुरू होतो आणि पुढे सूत्रसंचालन ,निवेदनासाठी कार्यक्रमांची मागणी ही मोठ्या प्रमाणात मिळते. या क्षेत्रात करिअर बनवण्यासाठी अनेक संधीही मान्यवरांच्या पसंती व ओळखीने होत असल्याचे 'बोलता बोलता' या पुस्तकातून लेखकाच्या प्रदीर्घ वाचन, संशोधन,अनुभवातून साकार झाल्याने वाचायला,अनुभवायला मिळते. अनेक दिग्गज मान्यवर व्यक्तींचे यासंदर्भातील नावे वाचताना आपण आपोआप नतमस्तक होतोच,पण 'बोलता बोलता' हे पुस्तक वाचल्यानंतर सूत्रसंचालन, निवेदन हे क्षेत्र किती महत्त्वाचे आहे आणि त्यासोबतच व्यासपीठावरील आपला आत्मविश्वास सुसंगत बोलण्यापासून कार्यक्रम सुरू झाल्यापासून संपेपर्यंत एक सूत्रसंचालक निवेदक म्हणून किती दिव्यातून जावे लागते याची उकल यातून करून प्रकरण निहाय कोणताही कार्यक्रम कसा यशस्वीपणे पार पाडायचा आहे,याचे तंत्र मंत्र यातून मिळते .नुकताच मराठी भाषेला मिळालेल्या अभिजात दर्जाच्या पार्श्वभूमीवर नवोदितांसाठी ही एक पुस्तकरुपी सापडलेली गुरुकिल्ली आपल्या मराठी साहित्य संग्रहात हमखास ठेवलं जाणार नवोदितांचे नक्कीच आत्मविश्वास वाढवण्यास मदत करील असंच हे पुस्तक ठरतंय

# मधुमेहींकरिता एकाच छताखाली उपचार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ कुणाल म्हात्रे**

कल्याण : मधुमेह ही भारतात सर्वात वेगाने वाढत जाणारी समस्या असून त्याच्या व्यवस्थापनाकरिता विशेष खबरदारी घेणे गरजेचे आहे. याकरिता झायनोवा शाल्बी मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटलने मधुमेही रुग्णांकरिता 'डायबेटिस ३६० सुपर-स्पेशालिटी क्लिनिक सुरु केले असून डोक्याच्या केसांपासून ते पायाच्या बोटांपर्यंत उपचार याठिकाणी केले जाणार आहेत. अत्याधुनिक सुविधांसह सुसज्ज अशा या केंद्रामध्ये अत्याधुनिक निदान साधने आणि व्यवस्थापनाच्या सर्वांगीण दृष्टिकोनासाठी तज्ज्ञांच्या सल्ला मिळणार आहे. क्लिनिकचे नेतृत्व डायबेटोलॉजी, एंडोक्राइनोलॉजी, कार्डिओलॉजी, नेफ्रोलॉजी, न्यूरोलॉजी, नेत्ररोग, त्वचाविकार, ऑर्थोपेडिक्स, स्त्रीरोग, पोडियाट्रीक आणि न्युट्रीशनीस्ट तज्ज्ञांद्वारे केला जाणार आहे. प्रतिबंध आणि निदान, उपचार व मधुमेहाशी संबंधित जीवनशैलीतील बदल करण्याविषयीचे मार्गदर्शन याठिकाणी उपलब्ध होणार आहे.

## झायनोवा शाल्बी हॉस्पिटलचे 'डायबेटिस ३६० सुपर स्पेशालिटी क्लिनिक'

डायबिटीज ३६० क्लिनिक मधील बहुविद्याशाखीय पॅनेलमध्ये डॉ. निमित नागडा(सल्लागार फिजिशियन), डॉ. रोहित बर्नबास (एंडोक्रिनोलॉजिस्ट), डॉ. अमित गंगवानी (इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट), डॉ. रुजू गाला(नेफ्रोलॉजिस्ट), डॉ. संजय रुपारेल (ॲपथॅल्मोलॉजिस्ट), डॉ. नताशा टिपणीस शहा(न्यूरोलॉजिस्ट) डॉ. अग्रजा त्रिपाठी(जनरल ॲण्ड लॅपरोस्कोपिक सर्जन), डॉ. हेमंत पटेल आणि डॉ. राजीव सिंग(डायबेटिक फूट सर्जन), डॉ. श्वेता लालगुडी, (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ. श्रीसनत राव आणि डॉ. धनंजय परब, (ऑर्थोपेडिक तज्ज्ञ)डॉ. सौरबाहा देशपांडे(त्वचारोगतज्ज्ञ)डॉ. सुनील मिश्रा(केस प्रत्यारोपण तज्ज्ञ) आणि दि. जिनल पटेल(क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट आणि आहारतज्ञ) यांचा समावेश आहे.

अनियंत्रित मधुमेहामुळे हृदयविकार, मूत्रपिंड निकामी होणे, दृष्टी कमी होणे आणि मज्जातंतूंचे नुकसान यासारख्या गंभीर गुंतागुंत होऊ शकते, अशी माहिती डॉ. रोहित बर्नबास, (एंडोक्रिनोलॉजिस्ट, झायनोवा शाल्बी हॉस्पिटल) यांनी दिली.

# शिक्षकांना सशक्त करण्यासाठी शेल एनएक्सप्लोरर्स रिफ्रेशर ४ संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**कल्याण** : लर्निंग लिंक्स फाउंडेशनच्या आयोजनाखाली शेल एनएक्सप्लोरर्स रिफ्रेशर ४ प्रशिक्षण कार्यक्रम विले पार्ले येथे यशस्वीपणे पार पडला. या कार्यक्रमात मुंबईतील एटीएल समन्वयकांनी अन्न, पाणी आणि ऊर्जा शाश्वततेशी संबंधित महत्त्वाच्या समस्यांवर नाविन्यपूर्ण दृष्टिकोनातून उपाय शोधण्यासाठी सहभाग घेतला.

शेल एनएक्सप्लोरर्स हा जागतिक स्तरावर राबवला जाणारा कार्यक्रम आहे, जो मुंबईतील एटीएल शाळांमध्ये शिक्षकांना सिस्टम थिंकिंग आणि डिझाईन थिंकिंग या संकल्पनांचे प्रशिक्षण देत आहे. या प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांना प्रकल्प विकासाच्या प्रक्रियेत सखोल समज देण्यात आली, ज्यामध्ये वास्तव समस्यांसाठी शाश्वत उपाय शोधण्यावर भर दिला गेला. या कार्यशाळांमुळे सहभागी शिक्षकांना गंभीर विचार करण्यास, प्रभावी सहकार्य करण्यास आणि त्यांच्या समुदायांमध्ये सकारात्मक बदल घडवणारे प्रकल्प तयार करण्यास प्रोत्साहन मिळाले.

शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि शाळांमधील नाविन्यपूर्ण विचारांची वाढ करणाऱ्या या प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. 'या प्रशिक्षणामुळे विचार करण्याची नवीन दृष्टी मिळाली आहे. हे केवळ गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण समजून घेण्यास मदत करत नाही, तर विद्यार्थ्यांना प्रभावी उपाय विकसित करण्यासाठी मार्गदर्शन करण्याची संधी देखील देते,' असे एका सहभागीने सांगितले.

लर्निंग लिंक्स फाउंडेशनच्या सहकार्याने शेल एनएक्सप्लोरर्स कार्यक्रम शाश्वतता आणि नाविन्य याविषयीची आपली बांधिलकी अधिक दृढ करत आहे. असे कार्यक्रम शिक्षकांना सशक्त बनवून पुढील पिढीला शाश्वत आणि समृद्ध भविष्य घडवण्यासाठी तयार करण्याचे काम करत आहेत.

# पर्यावरण दक्षता मंडळाच्या वतीने माती महोत्सवाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**



**कल्याण** : मातीच्या संरक्षणासाठी जागरूकता व्हावी या उद्देशाने २०१४ पासून जागतिक मृदा दिन ५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. दरवर्षी एक वेगळी थीम असते. २०२४ च्या जागतिक मृदा दिनाची थीम 'मातीची काळजी घेणे: मोजमाप, देखरेख, व्यवस्थापन करणे' हि आहे.

मातीचे मोजमाप, निरीक्षण आणि व्यवस्थापनाला प्राधान्य देऊन, आम्ही अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि पर्यावरणीय आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक शाश्वत पद्धती लागू करणे हे या थीमचे उद्दिष्ट आहे. मातीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी पर्यावरण दक्षता मंडळाने माती महोत्सवाचे आयोजन ठिकठिकाणी केले आहे. यावर्षी पहिल्यांदाच ज्ञानप्रसारक मंडळाच्या चार्टर्ड इंग्लिश स्कुल येथे माती महोत्सव आयोजित करण्यात आला. पर्यावरण दक्षता मंडळ, एन्विरो व्हिजिल, आणि ज्ञानप्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव साजरा करण्यात आला.

या महोत्सवासाठी शाळेतील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण शाळेकडून प्रशिक्षण दिले गेले जेणेकरून ते विद्यार्थी माती महोत्सवात माहिती देतील. या महोत्सवामध्ये भारतात विविध भागात आढळणाऱ्या मातीचे नमुने, मातीची जलधारण क्षमता, मातीचा सामू, मातीमधील ह्यूमस (खत) तयार करणारी जादूची बादली, जमिनीची संरचना, याबद्दलची माहिती प्रयोगातून दिली. माती महोत्सवाचा लाभ ज्ञानप्रसारक मंडळाच्या चार्टर्ड इंग्लिश स्कुल आणि ज्ञानदीप विद्यालय या शाळेतील विद्यार्थ्यांनी, त्यांच्या पालकांनी व पर्यावरणप्रेमींनी घेतला. मातीशी नातं जपायचं असेल तर मातीत जाऊन काम केलं पाहिजे, झाडे लावली पाहिजेत हा संदेश या माती महोत्सवातून देण्यात आला.

# महाराष्ट्र राज्याच्या तृतीयपंथीयांच्या धोरणाची केडीएमसी अंमलबाजवणी करणार

## समाज विकास विभागाच्या उपयुक्तांनी साधला किन्नर पंथीयांशी संवाद



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : किन्नर समुदाय हा समाजातील एक दुर्लक्षित, उपेक्षित समाज आहे, या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी आज अस्मिता किन्नर संस्थेच्या कल्याण पूर्व येथील कार्यालयास समक्ष भेट देऊन तेथील किन्नर पंथीयांशी संवाद साधला. त्यांच्याशी चर्चा करत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि समाजातील या दुर्लक्षित घटकास मुख्य प्रवाहात आणून मानसन्मानाने जगण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याबाबत किन्नर पंथाच्या गुरू नीता केणे यांचेशी सविस्तर चर्चा केली.

किन्नर पंथीयाची प्रथम महापालिकेकडे नोंदणी करून त्यांचे मनोगत, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांच्यासाठी प्रथमतः महापालिकेच्या नाट्यगृहात किन्नर महोत्सव आयोजित केला जाईल. किन्नर पंथीयांचे बचत गट तयार करून त्यांना व्यवसायभिमुख प्रशिक्षण देऊन उदर निर्वाहासाठी मार्केट उपलब्ध करून त्यांच्या उपजीविकेसाठी महापालिकेमार्फत सहकार्य केले जाईल असे आश्वासन उपायुक्त संजय जाधव यांनी यावेळी तेथे उपस्थित असलेल्या किन्नर पंथीयांना दिले. किन्नर समुदायाने महापालिकेच्या उपक्रमांमध्ये सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन महापालिका करीत असलेल्या सहकार्याबाबत समाधान व्यक्त केले आणि महापालिका आयुक्त स्वतः डॉक्टर असल्यामुळे त्यांनी त्यांच्याशी हितगुज करण्यासाठी वेळ मागितली आहे. आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच किन्नर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

## मविआला सुरुंग ....

पान १ वरून ▶▶ असे उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच बाबरी मशीद पाडणाऱ्यांचे मी अभिनंदन करतो असे म्हणून ते आमच्या जखमेवर मीठ चोळत आहेत. त्यामुळे अशा लोकांशी मी कधीही राहू शकत नाही. शरद पवार आणि काँग्रेसनेही त्यांच्यासोबत राहण्याबाबत विचार करावा.या निर्णयाबाबत मी अखिलेश यादव यांच्याशी बोलणार असून आम्ही महाराष्ट्रात महाविकास आघाडीसोबत राहू शकणार नसल्याची भूमिका त्यांना सांगणार आहे. इंडिया आघाडीसोबत राहायचे की, नाही याबद्दलचा निर्णय अखिलेश यादव घेतील,' असेही सांगत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

## सभागृह नेते पदावर...

पान १ वरून ▶▶ शपथ घेतली आहे. त्यानुसार त्यांच्याकडे हे पद गेल्यास काही वावगं ठरत नाही. दुसरीकडे, महाराष्ट्र मंत्रिमंडळ विस्ताराबाबत महापरिषदेची मोठी बैठक होऊ शकते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यात मंत्रिमंडळ खात्यांबाबत चर्चा होणार आहे. यानंतर ११ किंवा १२ डिसेंबरला मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपकडे गृहखाते मागितल्याचा शिवसेना आमदार भरत गोगावले यांचा दावा खरा नसून विभागांच्या विभाजनाबाबत चर्चा सुरू आहे.

## मधुकरराव पिचड यांच्या...

पान १ वरून ▶▶ असल्याचे नमूद करून श्री. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राच्या राजकारणातील दलित, आदिवासी वंचित समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा त्यांची उन्नती व्हावी यासाठी आणि आदिवासींच्या वन जमिनीचा प्रश्न सोडवण्यासाठी ते कार्यतत्पर होते. राजकारणी म्हणून नव्हे तर एक समाजसुधारक म्हणूनही त्यांनी चांगले काम केले. आदिवासींच्या हक्कांसाठी त्यांनी काम केले. निळवंडे धरणाचं २० किलोमीटरचे काम थांबले होते, तेव्हा पिचड साहेबांच्या माध्यमातून निळवंडे धरणाचे काम मार्गी लागले. या धरणामुळे शंभर किलोमीटर पर्यंतच्या परिसरातील शेतकऱ्यांना आज पाणी मिळत आहे. भंडारदरा (निळवंडे) धरणाला थोर स्वातंत्र्य सेनानी राघोजी भांगरे जलाशय नाव देण्यासाठी त्यांनी आग्रही भूमिका मांडली होती. ते मितभाषी, व्यासंगी आणि उत्तम वक्ते होते. विविध विषयाचा ज्ञान, व्यासंग आणि सर्वांशी संपर्क ठेवून होते. महाराष्ट्रातील एक सुसंस्कृत, वंचितांच्या हक्कांसाठी लढणारे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या जाण्याने अतिव दुःख झाले आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

याप्रसंगी आमदार राधाकृष्ण विखे पाटील, आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार किरण लहामटे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, श्रीमती हेमलता पिचड, वैभव पिचड, हेमंत पिचड आदी उपस्थित होते. पिचड यांच्या पार्थिवावर मधुकरराव पिचड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी सालीमठ यांनी पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. पोलीस दलाने बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिली.

यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, हेमंत सावरा, राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे आमदार नरहरी झिरवाळ, सत्यजित तांबे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, शिवाजीराव मोघे, वसंतरावं पुरके माजी खासदार सदाशिवराव लोखंडे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, भानुदास मुरकुटे, भाऊसाहेब कांबळे आदिवासी विकास परिषदेचे अनेक नेते यांच्यासह राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक व्यक्ती यावेळी उपस्थित होते. देवठाण, विरगांव फाटा, अकोले शहर, अकोले भाजपा कार्यालय, अगस्ती महाविद्यालय मध्ये त्यांच्या अंत्य दर्शनासाठी पार्थिव ठेवण्यात आले होते. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## आमदारांचा शपथविधी...

पान १ वरून ▶▶ आमदारांची संख्या ७८ इतकी आहे. या सर्व आमदारांच्या आगामी काळातील कामगिरीबद्दल राज्यातील जनतेला उत्सुकता आहे. दरम्यान, एकीकडे आमदारांच्या शपथविधीची लगबग सुरु असताना दुसरीकडे महायुतीच्या गोटात मंत्रिमंडळातील खातेवाटबाबात खलबते सुरु आहेत. शनिवारी यासंदर्भात महायुतीच्या नेत्यांची बैठक होण्याची शक्यता आहे. या बैठकीत कोणाच्या वाट्याला किती मंत्रीपदं आणि कोणती खाती येणार, याबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

# उल्हासनगर महापालिकेचा टीबी मुक्त शहराचा संकल्प




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**उल्हासनगर, प्रतिनिधी :**

देशभरात क्षयरोग नियंत्रण करण्यासाठी सरकार व सामाजिक संस्था युद्ध पातळीवर प्रयत्न शील आहेत. उल्हासनगर शहरात टिबी हद्दपार करण्यासाठी प्रशासन व आरोग्य विभाग देखील अनेक उपक्रमांमधून समाजामध्ये या आजाराच्या उपचारांच्या दृष्टीने जनजागृती करत आहे. भारत क्षयरोग मुक्त करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी धडपडत असतांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून क्षय दिनानिमित्त कॅम्प २ मधील नागरी आरोग्य केंद्र - २ यांनी ' १०० दिवस टीबी मुक्ती साठी ' या अभियानाचे उद्घाटन माजी महापौर मीना आयलानी यांच्या हस्ते करण्यात आले.


या कार्यक्रमात रोटरी क्लब विठ्ठलवाडी यांच्याकडून टी.बी. पेशंट यांना राशनकिट देण्यात आले. तसेच, सर्व नागरिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. यावेळी टीबी हा भारतातून पूर्ण नष्ट व्हावा या विषयी सामुहिक शपथ घेण्यात आली. याप्रसंगी डॉ. मोहिनी धर्मा, सहाय्यक आयुक्त विजय खेडकर, भाजपा महिला नेत्या मंगला चांडा उपस्थित होते.

# कमलादेवी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे रक्तदान शिबीर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

उल्हासनगर : रक्तदान सर्वात श्रेष्ठ दान असुन समाजात नव्या पिढीला रक्तदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी कमलादेवी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते.विठ्ठलवाडी येथे स्थित या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजने मार्फत आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी स्वयं स्फूर्तीने पुढाकार घेऊन ७० पेक्षा अधिक रक्त बाटल्या संकलीत केल्या. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे संस्था अध्यक्ष सदानंद बाबा तिवारी यांनी विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मुथा एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष प्रकाश मुथा कमलादेवी महाविद्यालया चे अध्यक्ष श्री सदानंद तिवारी उपस्थित होते. तसेच, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सिंग, आय क्यु ए सी समन्वयक अश्विनी राणे, अधीक्षक सचिन चौधरी यांनी या शिबिराच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. हे रक्तदान शिबिर लाईफ लाईन ब्लड सेंटर कल्याण यांच्या मदतीने आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात कमलादेवी महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक वर्गानेही रक्तदान केले. त्याच बरोबर कॉलेजबाह्य नागरिकांनी देखील सहभाग दर्शवला.




# अटाळीतील १२५ बांधकामे जमीनदोस्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण : टिटवाळा-कल्याण-डोंबिवली ते शिळफाटा दरम्यानच्या ३० किलोमीटर लांबीच्या बाह्यवळण रस्ते मार्गात अडथळा ठरणारी १२५ बांधकामे कल्याण डोंबिवली पालिकेच्या अ प्रभागाच्या अतिक्रमण नियंत्रण पथकाने शुक्रवारी जमीनदोस्त केली. या कारवाईमुळे मागील काही वर्षापासून अटाळी भागात रखडलेला बाह्यवळण रस्ते मार्गाचा टप्पा बांधणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत टिटवाळा-आंबिवली अटाळी-गांधारे पूल-वाडेघर ते दुर्गाडी किल्ला-पत्रीपूल ते मोठागाव-कोपर-भोपर ते शिळफाटा- काटई-हेदुटणे असा ३० किलोमीटर लांबीचा कल्याण-डोंबिवली शहराबाहेरून जाणारा बाह्यवळण रस्ता उभारणीचे काम सुरू आहे. या रस्त्यामधील टिटवाळा ते वाडेघरपर्यंतचे रस्ते बांधणीचे टप्पे पूर्ण झाले आहेत. या टप्प्यामधील अटाळी भागात वळण रस्त्याच्या मार्गात १२५ चाळ, झोपड्यांची बांधकामे होती.

या रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न काही वर्षापासून रखडला होता. हा प्रश्न आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या पुढाकाराने मार्गी लागला. त्यामुळे आयुक्त डॉ. जाखड यांच्या आदेशावरून अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांनी अतिक्रमण नियंत्रण, फेरीवाला हटाव पथक, जेसीबी आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शुक्रवारी दिवसभरात अटाळी भागातील वळण रस्ते कामाला अडथळा ठरणारी १२५ बांधकामे जमीनदोस्त केली.

**अटाळी येथील काही भागात वळण रस्ते मार्गात १२५ बांधकामे बाधित होती. या बांधकामातील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या पुढाकाराने मार्गी लागला. आयुक्तांच्या आदेशावरून या महत्वपूर्ण वळण रस्ता टप्प्यातील १२५ बांधकामे तोडण्यात आली. संदीप रोकडे (साहाय्यक आयुक्त, अ प्रभाग, टिटवाळा)**

वळण रस्ते मार्गात अटाळी येथे बांधकामे असल्याने एमएमआरडीएला त्या भागात रस्ता बांधणीचे काम करता येत नव्हते. पालिकेने रस्त्यासाठी जमिनीचे संपादन करून ती जमीन एमएमआरडीएला रस्ते कामासाठी हस्तांतरित करायची आहे. जमीन भूसंपादन आणि हस्तांतरणाचे काम पालिकेकडून केले जात नसल्याने अटाळीतील काम अनेक वर्ष रखडले होते.

या वळण रस्ते कामातील दुर्गाडी किल्ला-पत्रीपूल ते ठाकुर्ली-खंबाळपाडा (खाडी किनारा भाग), डोंबिवलीतील गणेशनगर, राजूनगर, देवीचापाडा ते मोठागाव माणकोली पुलापर्यंतच्या वळण रस्ते मार्गाचे काम एमएमआरडीएने सुरू केले आहे. या कामासाठीची बहुतांशी जमीन पालिकेने एमएमआरडीएला हस्तांतरित केली आहे. या कामासाठी सुमारे ३५१ कोटीचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

मोठागाव माणकोली ते पत्रीपूल टप्पा पूर्ण झाल्यानंतर माणकोली पुलावरून वाहनाने प्रवाशांना डोंबिवलीत न येता शहराबाहेरून कल्याण दिशेने जाता येणार आहे. कल्याणमधील प्रवाशांना याच रस्त्याने माणकोली पुलावरून ठाणे, मुंबईत जाता येणार आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी